BALGRAM MAHARASHTRA PUNE


# बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र
## 'अर्जुन' बिल्डिंग, कोरेगांव रोड, पुणे ४११००१

दुरध्वनी ०२०-२६१२२०३१...E-mail-mhbalgram@gmail.com
Web site--balgrammaharashtra.org.


**: वार्षिक अहवाल २०१६-२०१७ :**

: वै शि ष्टे :

१] संस्था नोंदणी अधिनियम १८६० नुसार नोंदणी क्रमांक-एमएएच/१४४, पुणे.

२] मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० नुसार नोंदणी क्रमांक - एफ /७५१/पुणे.

३] संस्था राजकारणापासुन पुर्णपणे अलिप्त. तसेच कोणतेही धर्म,पंथ किंवा तत्सम संघटना यांना संस्था बांधील नाही.

४] आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ८० जी नुसार आयकर ॲक्ट परिपत्रक क्रमांक- ७/ २०१० (प्र.क्र.१९७/२१/२०१०-आयटीए-I) दि. २७-१०-२०१० अन्वये कायमस्वरूपी सवलत/सुट.

५] आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ३५ सी नुसार अधिसुचना क्र.-डज६४२(ई) दिनांक १२-३-२०१३ अन्वये एफ नंबर v27015/22015-SO (NATCom) valid upto 31-3-2018 तीन वर्षांसाठी (२०१५-२०१८) पर्यन्त १०० टक्के आयकर सुट/सवलत.

**********

BALGRAM MAHARASHTRA PUNE




बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र
'अर्जुन' बिल्डिंग, कोरेगांव रोड, पुणे ४११००१

**संस्थापक/अध्यक्ष**
कै. श्री दौलतराव जिवराव उर्फ बाबासाहेब जाधव

**अध्यक्ष**: श्री रजनीकांत नेन्सी
**मानद सचिव** : श्रीमती रंजन पुराणिक
**उपाध्यक्ष**: डॉ. सुनिल देशमुख
**मानद खजिनदार**: श्रीमती आशा शेठ

**क्षेत्रीय अध्यक्ष**

मुंबई: श्री शामकांत पाटील
नागपुर: सौ. समुन कांडगे
पुणे: सौ. मिनल टिपणीस
औरंगाबाद: श्री सुनिल देशमुख

**विश्वस्त**

श्री रजनीकांत नेन्सी
श्री सुनिल देशमुख
श्रीमती आशा शेठ
श्री रूपचंद कांडगे
श्री शामकांत पाटील
श्रीमती रंजन पुराणिक
श्रीमती शेवंता चव्हाण

**संचालक मंडळ**
श्री रजनीकांत नेन्सी
श्रीमती शेवंता चव्हाण
श्री रूपचंद कांडगे
सौ. दिपा राहतेकर
श्रीमती नलिनी फुसे
श्री कोमल शहा

**संचालक मंडळ**
श्रीमती रंजन पुराणिक
श्री सुनिल देशमुख
सौ. मिनल टिपणीस
सौ. सुमित्रा बेनाडीकर
सौ. मिनल जोशी
श्री अशोक घाडगे, कार्यकारी संचालक

**संचालक मंडळ**
श्रीमती आशा शेठ
श्री शामकांत पाटील
सौ. सुमन कांडगे
सौ. जयंती हळदीपुरकर
श्री नंदकुमार वाळंज

**प्रशासन प्रतिनिधी** : मा. उपायुक्त महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे ४११००१

**: सनदी लेखापल :**
मे विकास खडसरे आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्,पुणे ४११०३७
. (आरती कदम ॲण्ड असोसिएटस्, पुणे)

मेसर्स आर.एस. मोहिते आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस् कोल्हापुर ४१६२०१

BALGRAM MAHARASHTRA PUNE



## : ऋ ण नि र्दे श :

बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्, पुणे संघटनेस खालील नमुद केलेल्या शासकीय, स्वयंसेवी संस्था,संघटना,व्यक्ति यांनी केलेल्या मदतीबाबत संस्था यांची ऋणी आहे.

१) मा. आयुक्त,महिला व बाल विकास आयुक्तालय,महाराष्ट् राज्य,पुणे यांनी बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेज,पुणे आणि बालग्राम महाराष्ट्राशी संलग्न व अधिनस्त असलेल्या संस्थांना दरडोई अनुदान रूपये १५०/-दरमहा मंजुर केले याबाबत बालग्राम महाराष्ट् आभारी आहे.

२) मा.आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट् राज्य,पुणे मा.आयुक्त व त्यांचे अधिकारी तसेच मा. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,पुणे मा. अध्यक्ष व सदस्य बाल कल्याण समिती यांनी बहुमोल मार्गदर्शन केले, याबाबत बालग्राम महाराष्ट् आभारी आहे.

३) अनेक व्यक्ति,संघटनांनी तसेच बालग्राम मधील असलेल्या संस्थांनी बहुमोल मदत केली, त्याबद्दल बालग्राम महाराष्ट् त्यांचे आभारी आहे.

४) अनेक व्यक्तिंनी रोख व वस्तुरूपाने देणग्या दिल्या तसेच संस्थांना भेटी देउन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बहुमोल मदत केली, त्याबद्दल बालग्राम महाराष्ट् आभारी आहे व आपली सदैस ऋणी राहिल.

*********************

## : श्र द्धां ज ली :

सन २०१६-२०१७ या वर्षात श्रध्दांजली वाहण्यात आली नाही.

BALGRAM MAHARASHTRA PUNE

: वार्षिक अहवाल :
: २०१६-२०१७ :

**बालग्राम चळवळः**

आजच्या अत्याधुनिक समाजामध्ये लाखो मुले-मुली अनाथ,निराधार,निराश्रित व कुटुंबा पासुन वंचित आहेत.ही मुले अन्न,वस्त्र आणि निवारा या मुलभुत गरजे बरोबरच कौटुंबिक जिव्हाळा,प्रेम,आस्था,भावनिक आधार आणि विकासाच्या संधी पासुन देखील दुर आहेत. अशी लाखो मुले त्यांच्या मुलभुत अधिकरा पासुनही वंचित आहेत. ही मुले अत्यंत कष्टमय जिवन जगत आहेत. अर्थातच त्यांना त्यांच्या सर्वांगिण विकासाची संधीही मिळत नाही. तद्त्वतच त्यांचा भविष्यकाळ अंधारमय झालेला आहे. अशा मुलांना योग्य वयातच त्यांचे संगोपन,शिक्षण व सुयोग्य पुनर्वसन करून त्यांना समाजामध्ये समायोजित करणेही काळाची गरज आहे. सामाजिक बांधिलकी आहे.

दुस-या महायुध्दामध्ये हजारे मुले अनाथ,बेघर व मानसिक रूग्ण झालेली असताना. पारंपारिक बाल संगोपन संकल्पनेला आवाहन देउन डॉ. हरमन मायनर यांनी ऑस्ट्रियामध्ये इम्स्ट (IMPTS) येथे १९४९ मध्ये जागातील पहिले बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस या संस्था स्थपनेव्दारे सुरू केले. पूर्वीच्या 'अनाथलयावर' मात करीत. बाल संगोपनाची गुरूकिल्ली शोधुन काढली. ती म्हणजे 'बालग्राम' होय. बालग्राम मध्ये विविध वयो गटातील मुल-मुली भाउ- बहिण म्हणुन कौटुंबिक जिव्हाळयात सदन माता/गृहमातेच्या निगराणीत सर्वांगिण विकास करून घेतात. मुलांना हवा असणारा भावनिक आधार ,प्रेम मिळाल्यामुळे मुलांची वाढ सोपस्कर होते. एका सदनिकेत ८ ते १० मुल-मुली एकत्र नैसर्गिक कुटुंबाप्रमाणे राहतात.अशा ५ ते २० सदनिका/घर म्हणजे 'बालग्राम' होय.

एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस ही बाल संगोपनाची आंतरराष्ट्रीय संकल्पना जगमान्य झाल्याने १३३ देशांमध्ये 'बालग्राम' व्दारे करोडो मुलांचा विकास साधला जात आहे. भारतामध्ये एस.ओ.एस. चळवळीची सुरवात १९६४ साली झाली. एस.ओ.एस. चे जनक डॉ. हरमन मायनर हे १९६३ मध्ये भारत भेटीस आले असताना तात्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांना 'बालग्राम एस.ओ.एस. संकल्पना' ही खुप आवडली आणि भारतातील पहिल बालग्राम दिल्ली ग्रीनफिल्ड येथे सुरू झाले. एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस ऑफ इंडिया ही बालसंगोपनातील अग्रेसर संस्था मानली जाते.हळुहळु त्याचा विस्तार होउन विविध राज्यांमध्ये बालग्रामे सुरू झाली.

महाराष्ट्रामध्ये बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र (बालग्राम महाराष्ट्र) या स्वयंसेवी संस्थेची स्थापना १९७४ साली झाली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.श्री दौलतराव जाधव (बाबासाहेब) हे महिला व बाल विकास या शासनाच्या विभागाचे प्रमुख आसतांना त्यांनी दिल्ली येथील बालग्राम पाहिले व डॉ. हरमन मायनर यांचे प्रेरणेतुन महाराष्ट्रामध्ये 'बालग्राम महाराष्ट्राची' स्थापना केली. महाराष्ट्रातील पहिल बालग्राम गागोदे (जिल्हा रायगड्) विनोबाजी भावे यांच्या निवासस्थानी श्रीमती शोभना रानडे (कस्तुरबा ट्रस्ट सचिव) इतरांचे सहकार्याने सूरू केले.

BALGRAM MAHARASHTRA PUNE



बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र/बालग्राम महाराष्ट्र हया ट्रस्टची सोसायटी रजिस्ट्रशन ॲक्ट अधिनियम १८६० नुसार नोंदणी क्रमांक-MAFH/F944 पुणे आणि मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० नुसार क्रमांक-F/759 पुणे नुसार नोंदणी करण्यात आली. बालग्राम महाराष्ट्र या संस्थे मार्फत १९७७ साली पन्हाळा येथे बालग्राम आणि १९७९ साली येरवडा,पुणे येथे बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस सुरू केले.

बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस् महाराष्ट्र/बालग्राम महाराष्ट्र या संस्थेतर्फे खालील बालग्रामे/उपक्रम चालविले जातात.

१) बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेज, येरवडा,पुणे (सध्या एस.ओ.एस. इंडिया, नवि दिल्ली नोव्हेंबर २०१४ पासुन पाच वर्षा करिता प्रशासक म्हणुन कार्यरत)
२) श्री दिलिपसिंह राजे घाटगे बालग्राम पन्हाळा,जिल्हा कोल्हापुर,
३) पंचदीप संकुल,नविन पनवेल, जिल्हा रायगड
४) ,सुनित विकास केंद्र (निला बालसदन),अंबरनाथ, जिल्हा ठाणे.
५) डॉ. हरमन मायनर सोशल सेंटर फॉर स्ट्रीट चिल्ड्रेन,डे केअर सेंटर ,शिवाजीनगर पुणे वरील उपक्रमे चालवली जातात. या सर्व संस्था बालग्राम महाराष्ट्र अधिनस्त आहेत.

**बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र मध्यवर्ती कार्यालयः**

अहवाल सालामध्ये श्री अशोक घाडगे कार्यकारी संचालक म्हणुन कार्यरत आहेत. श्री वैभव खेंगरे, निधी संकलक, सौ. वंदना जाधव,लेखापाल, श्री श्रीकांत इनामदार, लिपिक-टंकलेखक, सौ. माधुरी कवडे,सहायक यांनी मध्यवर्ती कार्यालयात काम केले. हे कार्यालय 'अर्जुन' बिल्डिंग, चौथा मजला,कोरेगांव रोड,पुणे ४११००१ येथे आहे.

मध्यवर्ती कार्यालयाकडुन खालील अत्यंत महत्वाचे कामाचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

१) बालग्राम येरवडा च्या जागेबाबत लॅण्ड लिज वाढवुन मिळणेबाबत मा. तहसीलदार व मा. जिल्हाधिकारी कार्यालयास पाठपुरावा चालु आहे.
२) बालग्राम महाराष्ट्राचे सन १९७४ पासुन विश्वस्त बदल (Change Report) चा पाठपुरावा मा. धर्मादाय आयुक्त कार्यालय पुणे यांचेकडे चालु होता २०१६ अखेर बदल अहवाल प्राप्त झाले.
३) स्थानिक समिती (Local Committee) बाबत नियमावली तयार करून समितीतील पदाधिकारी व त्यांची कर्तव्ये व जबाबदा-या याबाबत समिती गठीत करून नियमावली तयार करून माहे एप्रिल २०१७ पासुन अंमलबजावणी चालु केली.
४) बालग्राम महाराष्ट्र कर्मचारी सेवा नियमावली (Service Rules) तयार केले. यासाठी विशेष समिती गठीत करण्यात आलेली होती व कायदेतज्ञ श्री आर.वाय. जोधी यांच्या बहुमोल सहकार्य/मार्गदर्शनानुसार ही नियमावली तयार केली असुन माहे एप्रिल २०१७ पासुन बालग्राम महाराष्ट्र मध्यवर्ती कार्यालय व अधिनस्त संस्थातील कर्मचा-यांना लागु करण्यात आली.

BALGRAM MAHARASHTRA PUNE

५) श्री वैभव खेंगरे यांची निधी संकलक म्हणुन नियुक्ति करून निधी संकलन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. असफल प्रयत्न.

६) बालग्राम महाराष्ट्र मध्यवर्ती कार्यालय व अधिनस्त संसीतील नियमित व इतर कर्मचा-यांचे वेतन श्रेणी बदल निश्चित करून ते माहे एप्रिल २०१७ पासुन संबंधीत कर्मचा-यांना लागु करण्यात आले.

**बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेज येरवडा,पुणे** मा. प्रधान सचिव महिला बाल विकास,मुंबई यांचे दि. २१-१०-२०१४ च्या आदेशानुसार बालग्रामची मान्यता व प्रमाणपत्र पुर्नस्थापित करून पाच वर्षासाठी प्रशासकास चालविण्यास देण्यात आले आहे. त्यानुसार एस.ओ.एस. इंडिया, नवि दिल्ली बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेज येरवडा,पुणे येथे माहे नोव्हेंबर २०१४ पासुन प्रशासक म्हणुन कार्यरत आहे.

**डॉ. हरमन मायनर सोशल सेंटर फॉर स्ट्रिट चिल्ड्रेनउ डे केअर सेंटर ,शिवाजीनगर पुणे** हा प्रकल्प राबवण्यात येतो. प्रकल्प इनचार्ज (Incharge) श्रीमती रंजनताई पुराणिक, प्रकल्प समन्वयक श्री शिरीष खामकर, कनिष्ट सामाजिक कार्यकर्त्या सौ. अरूणा मिर्वणकर आणि सौ नंदा बिबवे (थोरात) यांनी काम पाहिले.

**श्री दिलिपसिंह राजे घाटगे बालग्रामपन्हाळा,कोल्हापूर** चे सौ. सुमित्रा बेनाडीकर स्थानिक समिती अध्यक्षा, श्री संतोष गायकवाड ,अधिक्षक तसेच श्री श्रीधर नामदेव शेलार, सहायक म्हणुन काम पहात आहेत.

**पंचदीप संकुल, नविन पनवेल** सौ. मिनल टिपणीस स्थानिक समिती अध्यक्षा म्हणुन काम पाहात आहेत. माहे फेब्रुवारी २०१६ पासुन श्री विनायक दिनकर पाटील अधिक्षक, सौ. स्वप्ना पेंढारकर, कौन्सिलर, सौ. पुनम पाटील सहायक म्हणुन काम पहात आहेत

**सुनित विकास केंद्र, निला बालसदन, अंबरनाथ** येथे श्रीमती दिपा राहतेकर स्थानिक समिती अध्यक्षा तसेच सौ. प्रियांका गुजर हया अर्धवेळ अधिक्षिका म्हणुन काम पहात आहेत.

### १) आनंद बालग्राम, शारदानगर, सगरोळी, जिल्हा नांदेडः

हे बालग्राम 'संस्कृति संवर्धन मंडळ,' शारदानगर, सगरोळी ही संस्था चालवित आहे. एकुण १२ पैकी दोन सदने केवळ मुलींसाठी चालविण्यात येतात. मुलींची मंजुर संख्या १०८ आहे. सध्या बालग्राममध्ये २४मुली आहेत. यापैकी ०४ मुली प्राथमिक, १० माध्यमिक, ०७ उच्च माध्यमिक, ०३ मुली महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत. अहवालसाली तीन मुली सोडुन गेल्या. अहवालसाली ०३ मुलींना व्यावसायिक कारणाने पुनर्वसित करण्यात आले. मुलांच्या

BALGRAM MAHARASHTRA PUNE



अभ्यासाकरिता कौन्सिलरची नेमणुक तसेच पर्यवेक्षीय व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी व संध्याकाळी ७ ते ९ या वेळात मुलांकडुन अभ्यास करून घेतला जातो. इ. १०वी आणि १२वी मधील मुलांसाठी उन्हाळी अभ्यास वर्ग घेतले जातात. अभ्यासाकरिता स्वतंत्र इमारत आहे. मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी शालेय शिक्षणा बरोबर अंतर्गत व मैदानी खेळांचे साहित्य व मार्गदर्शक उपलब्ध करून दिले आहेत. उदा. फुट बॉल, व्हॉलीबॉल, क्रिकेट, कॅरम,थाळी फेक,गोळा फेक इ. साहित्य उपलब्ध आहे. खेळण्यास प्रशस्त मैदाने आहेत. करमणुकीसाठी दुरदर्शन व आकाशवाणी संच आहेत. मुलांना वाचनालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुलींच्या आरोग्य संदर्भात डॉक्टर संस्थेतुन येउन मुलींच्या आरोग्याची तपासणी महिन्यातुन दोनदा करतात, तसेच संस्थेचे 'संजीवनी आरोग्य मंदीर' हे सुसज्ज रूग्णालय आहे. धार्मीक व राष्ट्रीय सण, थोर नेत्याच्या जयंत्या, विशेष दिन साजरे केले जातात.

अहवालसाली श्रीमती हेर्लेकर व सर्व शिक्षिका, श्री छ. शिवाजी हायस्कुल, श्री नरावाड एस.व्ही. नायब तहसीलदार, श्री रजनीकांत नॅन्सी, अध्यक्ष, श्री अशोक घाडगे, कार्यकारी संचालक बालग्राम महाराष्ट्र,पुणे, श्री प्रशांत दिवेकर शिक्षक ज्ञान प्रबोधिनी पुणे तसेच अनेक मान्यवरांनी संस्थेला भेट देउन कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे अहवालसाली कु. अक्षदा अविनाश आराध्ये इ. ९वी या वर्गात सर्व प्रथम आल्याबद्दल मुलीची गुणवंत विद्यार्थीनी म्हणुन बालगृहातुन निवड झाल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## २) इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट, (ज्ञानेश-मुक्ताई बालसदन)फुलगांव,पुणेः

या बालग्राम मध्ये एकुण चार बालसदने आहेत. हे बालग्राम मुलींसाठी चालविले जाते. मुलींची मंजुर संख्या ३० आहे. पटावर एकुण २७ मुली आहेत. यापैकी ०३ मुले प्राथमिक, १४ मुली माध्यमिक,०८ मुली उच्च माध्यमिक, एक मुलगी महाविद्यालयीन आणि एक मुलगी व्यवसायिक शिक्षण घेत आहे. अहवालसाली तीन मुलींना पालकांच्या ताब्यात दिले

संस्थेने वैद्यकीय सेंवेसाठी प्रथमोपचार पेटी ठेवली आहे. अहवालसाली मरकळचे डॉ. दिवटे आठवडयातुन तीन दिवस बालसदनमध्ये मुलांच्या आरोग्य तपासणीकरिता येतात. वेळ प्रसंगी लाईफ लाईन हॉस्पिटल वाघोली तसेच पुण्यातील सहयाद्री हॉस्पिटल या ठिकाणी तातडीच्या उपचारासाठी नेण्यात येते. तसेच डॉ. प्रकाश शहा भेट देतात आणि वार्षिक वैद्यकीय तपासणी करतात.

या बालसदनामध्ये ०४ ते १८ या वयोगटातील मुली आहेत. मुलींच्या शिक्षणातील शंकांचे निरसनासाठी टयुटर /शिक्षकांची नियुक्ति केली आहे. तसेच डॉ. प्रदीप आगाशे,श्रीमती आगाशे,श्री मराठे, श्रीमती वंदना शेठ, श्रीमती वर्षा पिटके आणि हितचिंतक मुलांना मार्गदर्शन करतात. इयत्ता १० वी च्या सर्व मुली पास झाल्या. वैशाली गायकवाड ७० टक्के, क्षितिजा हेर्लेकर ५४ टक्के गुण मिळाले. वैशाली गायकवाड ११ वी कॉमर्स करीत आहे. मुलींनी सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला. वर्धापन दिनानिमित्त मुलींनी नृत्य,नाटक,गायन केले.

BALGRAM MAHARASHTRA PUNE



मुलींना भरपुर खेळावयास दिले जाते. संस्थेचे खुप मोठे आवार आहे. त्याला कुंपण घातले आहे त्यामुळे मुलांना मैदानी खेळ खेळता येतात. लहान मुलींसाठी झोके,सी-सॉ अशा प्रकारचे मोठे खेळ आवारात आहेत. क्रिकेट,व्हॉलीबॉल,रिंग,झोपाळे ,चिमुकला संसार,टेडी बेअर,गाडया वगैरे साहित्य आहे. लहान मुलींसाठी इनडोअर खेळ आहेत.

मुलींच्या करमणुकीसाठी दुरदर्शन, टेपरेकॉर्डर, व्हीसीआर, रेडिओ, वर्तमानपत्रे, मासिके आणि छोटे वाचनालय आहे. संस्थेच्या सर्व उपक्रमांचे एकत्र संस्कृती उपक्रम सुरू केला आहे. मुलींच्या शैक्षणिक व खेळा विषयी क्लासेस व शिक्षकांची सुविधा उपलब्ध आहे.मुलींना पेटी,बासरी आणि तबला वादन डॉ. प्रदीप आगाशे शिकवतात. मुलींनी सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेउन वर्धापन दिनानिमित्त कलेच्या विविध क्षेत्रात प्रत्यक्षिके सादर केली.

संस्थेत सर्व धर्मीय आणि राष्ट्रीय सण तसेच संस्थेच्या निगडीत सगळयांचे वाढदिवस, वर्धापन दिन,उपक्रमांचे स्थापना दिन साजरे केले जातात. विविध शालेय,क्रिडा स्पर्धामध्ये मुली सहभागी होउन बक्षिसे, प्रमाणपत्रे मिळवितात.

संस्थेला जेष्ठ नागरिक संघ, समाजातील प्रतिष्ठित नागरिक, व्यवसायिक तसेच अनेक मान्यवरांनी भेट देउन संस्था निष्ठापुर्वक व आस्थेने काम करीत असल्याचा अभिप्राय दिला.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे मुलींचे आधार कार्ड काढले. डॉ. प्रदिप आगाशे यांच्या मार्गदर्शनाखाली मुली १२ वी पास झाल्या. शुध्द पाण्यासाठी आर.ओ. सिस्टिम बसविण्यात आले..

### ३) सुनित विकास केंद्र, निला बालसदन, अंबरनाथः

हया बालसदनाचे व्यवस्थापन बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र मार्फत केले जाते. एक बालसदन असुन ०८ मुली आहेत. हे बालग्राम फक्त मुलींसाठी चालविले जोते. मुलींची मंजुर संख्या १० आहे. त्यापैकी ०६ प्राथमिक, ०२ माध्यमिक, शिक्षण घेत आहे. अहवालसाली दोन जागा रिक्त आहेत..

मानद डॉ. योगेश ठुसे आणि डॉ. संध्या शिंदे यांचेकडुन मोफत वैद्यकिय उपचार करतात. मुलींची स्त्री रोग तज्ञां मार्फत तपासणी होते. प्रत्येक तीन महिन्याला उंची-वजन केले जाते. मुलींच्या खेळांसाठी कॅरम, दोरीच्या उडया, सापशिडी, बुध्दिबळ, बास्केट बॉल,बॅट मिंटन,कोडी पुस्तके इ. खेळ आहेत. तसेच करमणुकीसाठी दुरदर्शन व आकाशवाणी संच, संगणक, टेपरेकॉर्डर गोष्टींची पुस्तके इ. साहित्य उपलब्ध आहे. श्री पराडकर-सौ. अयर संस्कार वर्ग सेवा भावाने घेतात तसेच सौ. चांदेकर आणि दाभाडे मुलांच्या शिकवणी घेतात. सर्व मुलांना वार्षिक परीक्षेत चांगले गुण मिळाले.

शालेय क्रिडा तसेच परीक्षा स्पर्धेत सर्व मुले सहभागी होतात. कु. रोशनी व अपेक्षा यांना आंतर शालेय निबंध स्पर्धेत उत्तेजनाचे बक्षिस मिळाले. कु. रोशनी बोराला वार्षिक परीक्षेत प्रतम क्रमांकाचे बक्षिस मिळाले. बालमहोत्सवात मुलींचा दुसरा क्रमांक आला अंजली लांब उडीत दुसरी आणि दुर्गा चित्रकलेत उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले. ज्ञानपिठ परीक्षेत अजलीचा दुसरा व रोशनीचा प्रथम क्रमांक आला.

BALGRAM MAHARASHTRA PUNE



संस्थेला स्थानिक नगरसेवक, समाजसेवक, सिने अभिनेत्री विशाखा सुभेदार आणि महेश सुभेदार यांनी तसेच अनेक मान्यवरांनी भेट देउन संस्था निष्ठापुर्वक व आस्थेने काम करीत असल्याचा अभिप्राय दिला.

बालसदनांत सर्व धर्मीय,राष्ट्रीय,विशेष दिन,म. गांधी जयंती इ. सण साजरे केले जातात.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणुन अहवालसाठी सर्व मुलींना ट्रेन आणि विमान प्रवासाने गोवा येथे सहलीस नेण्यात आले आणि सर्वांनी सहलीचा आनंद लुटण्याबाबतचा अंतरभाव करण्यात आला.

### ४) पंचदीप संकुल, नविन पनवेलः

या बालसदनाचे व्यवस्थापन बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्, पुणे यांचे मार्फत केले जाते. बालसदनाची संख्या दोन असुन मंजुर संख्या २० आहे. या दोन बालसदनामध्ये ०७ मुले व १४ मुली असे एकुण २१ मुले आहेत, यापैकी बालवाडीत ०१, ०४ मुले प्राथमिक, ०४ मुले माध्यमिक ०२ मुले उच्च माध्यमिक, ०६ मुली महाविद्यालयीन तसेच ०४ मुली व्यवसाय शिक्षण घेत आहेत. अहवाल साली संस्थेत ०४ मुली व ०१ मुलगा नव्याने दाखल झाला आणि ०६ मुले पालकांच्या ताब्यात दिली.

बालग्राम मध्ये वैद्यकीय सोयी उपलब्ध आहेत. डॉ. मिलिंद टिपणीस,श्री व सौ. भांडारकर, व डॉ. वीणा पुरोहित हे मुलांची नियमित आरोग्य तपासणी करतात तसेच वैद्यकीय अडचणी सोडविल्या जातात.

मुलांच्या खेळासाठी एक छोटेसे मैदान, घसरगुंडी, कॅरम, क्रिकेट, दोरीवरच्या उडया, बॅटमिंटन, झोके, सी-सॉ, सापशिडी,बुध्दिबळ तसेच इतर बौध्दिक खेळ आहेत. पझल्स,बुध्दिबळ, खाजगी क्लासेसमध्ये कराटे व योगा विनामुल्य शिकतात. करमणुकीसाठी दुरदर्शन संच, टेपरेकॉर्डर, स्वतंत्र लायब्ररी, गोष्टीची पुस्तके, वर्तमान पत्रे, मासिके, चित्रकला पुस्तके उपलब्ध आहेत. तसेच अनुभव शेअरिंग सेशन ॲक्टिव्हिटि नियमित सुरू आहे.

अहवालसाली मुलांनी शलेय निबंध, वक्तृत्व स्पर्धा,दोरी उडी, संगीत खुर्ची, धावणे जिल्हास्तरीय विविध स्पर्धांमध्ये भाग घेउन बक्षिसे व प्रमाण पत्र मिळविलीत.

सौ. मिनल टिपणीस,सौ. भारती अयर सौ. लता ,सौ. काजरेकर, सौ. संगिता जोशी, डॉ. सावित्री रघुपती, सौ. नलावडे आणि गृहमाता मुलांचा अभ्यास घेतात. मुलांचे इंग्रजी व्याकरण करून घेतात. मुलांसाठी वाचनालय उपलब्ध आहे. प्राथमिक शिक्षण घेणारी सर्व मुले 'अ' श्रेणीत उत्तीर्ण झाली. कु. सुनिता त्रिभुवन इयत्ता ९वीत तिसरा तर हेमांगी भोईर इयत्ता ११ वी कॉमर्स कॉलेजमध्ये दुसरा क्रमांक मिळविला. मुलांना उन्हाळी सुट्टीत MS-CIT कोर्स चालू केले आहेत. मुलांची शैक्षणिक प्रगती उत्तम असुन मुले चांगल्या मार्कस्नी पास झाली आहेत

BALGRAM MAHARASHTRA
PUNE



अंतरराष्ट्रीय नेमबाज सूमा शिलर यांनी संस्थेस भेट देवुन मुलांशी संवाद साधला. मराठी मालिका 'खुलता कळी खुलेना' या टीमन भेट दिली. तसेच बाल कल्याण समिती रायगड आणि जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, रायगड यांच्या नियमित भेटी होतात. तसेच अन्य मान्यवर, समाज सेवक, नगरसेवक, देणगीदार, हितचिंतक सभासदांनी अहवालसाली भेट देवुन कामाबद्दल प्रशंसा केली. तसेच गेट टुगेदर साजरा करतात.

संस्थेत सर्व धर्मीय,राष्ट्रीय सण जयंत्या,पुण्यतिथ्या,वाढ दिवस साजरे केले जातात

वशेष उल्लेखनीय बाब म्हणजे जिल्हा महिला व बाल विकास,रायगड आयोजित बाल मेळाव्यात मुलांनी कबड्डीमध्ये प्रथम क्रमांक तर रांगोळी उत्कृष्ट काढण्यात प्रथम क्रमांक मिळविला. मुलांनी मेळाव्यात उतकृष्ट नृत्य सादरीकरण केले.

## ५] चंद्रभान आठरे पाटील बालगृह, अहमदनगरः

या बालगृहामध्ये ०८ बालसदने आहेत. या बालगृहामध्ये मुलांची मंजुर संख्या १०० आहे. प्रत्यक्ष पटावर ५० मुले आहेत. त्यापैकी २८ मुले आणि २२ मुली आहेत. अहवालसाली ०३ मुली व ०६ मुले एकुण ०९ बालके संस्थेत दाखल झाली. त्यापैकी ०८ मुले प्राथमिक, ३० मुले माध्यमिक, १२ मुले उच्च माध्यमिक शिक्षण घेत आहेत. अहवालसाली १० मुलांना पालकांच्या ताब्यात देवुन पुनर्वसित करण्यात आले. मुलांच्या गरजेनुसार वैद्यकीय मदत घेतली जाते. मुलांचे डॉ. तेजस पाटील यांनी दंत निदान केले व योग्य सल्ला व मार्गदर्शन केले. त्याशिवाय संस्थेमध्ये आवश्यक औषधे उपलब्ध असतात व गरजेनुसार डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार दिली जातात. सुसज्ज खेळाचे मैदान असुन क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलिबॉल, बॅटमिंटन, रिंग इत्यादि साहित्य असुन याव्यतिरिक्त झोके, घसरगुंडी, सीसॉ उपलब्ध आहे. करमणुकीसाठी दुरदर्शन संच, संगित साहित्यात ढोलकी, हार्मोनियम, कॅसियो, सिन्थेसायझर, झांजा, लेझिम इत्यादि साहित्य उपलब्ध आहेत.

संस्थेत सर्व विषयांचे शिक्षक असुन शिकवणी घेतली जाते. मुलामुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिकेसाठी शिक्षिकेची नियुक्ति केली आहे. तसेच माध्यमिक मुलांसाठी अधिक्षक श्री शिंदे व श्री काळे व सौ काळे हे ज्यादा तासिका घेतात. शालेय स्पर्धेत विविध खेळांमध्ये ,समुहगान,समुह नृत्य स्पर्धेत मुलांनी सहभाग घेउन राज्यस्तरीय स्पेर्धेत विशेष प्राविण्य, बक्षिसे, प्रशस्तीपत्रके मिळविली.

संस्थेमध्ये विविध धार्मिक सण,राष्ट्रीय दिन-सण, थोरांच्या जयंत्या, साज-या केल्या जातात. संस्थेस श्री अभिषेक कळमकर, महापौर म.न.पा., सौ. एस.एस. जाधव, परिविक्षा अधिकारी, प्रा. बेदरकर, श्री पवार व सौ. बंडोलू, सदस्य, बाल कल्याण समिती, सौ. विजयामाला माने खरात , जि.म.बा. अधिकारी, श्री संग्रामभैया जगताप, आमदार, ब्रि. अजित आपटे, श्री व्ही.बी. कुलकर्णी, न्यायाधिश, श्री पी.डी. डिग्रजकर, न्यायाधिश, रिया शर्मा, इ. मान्यवरांनी भेट देउन समाधान व्यक्त केले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे १५ ऑगस्ट २०१५ स्वातं>य दिन मा. सौ. विजयामाला माने खरात जि.म.बा.अधिकारी, अहमदनगर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच मुलांसाठी दररोज ध्यानधारणा, वर्तमान पत्रे वाचन, सुविचार, प्रश्नमंजुषा सह वाचन-लेखन, शिकवणी वर्ग आणि वाचनालय उपक्रम घेण्यात येतात.

BALGRAM MAHARASHTRA PUNE



६) **श्री दिलिपसिंह राजे घाटगे बालग्राम पन्हाळा, जिल्हा कोल्हापुरः**

या बालग्रामचे व्यवस्थापन बालग्राम महाराष्ट्र करते. दोन बालसदने आहेत. हया बालग्रामसाठी मंजुर संख्या ३० आहे. या बालग्राम मध्ये एकुण २० मुले आहेत. त्यापैकी ०५ मुले प्राथमिक, ०५ मुले माध्यमिक, ०६ मुले उच्च माध्यमिक,०१ मुलगा महाविद्यालयात तर ०३ मुले व्यावसायिक प्रशिक्षण घेत आहेत. ०३ मुलांचे पुनर्वसन करण्यात आले. ०२ मुले नोकरी निमित्ताने पुनर्वसित झाली.

वैद्यकिय उपचारासाठी मुलांना शासकीय, ग्रामीण रूग्णालयात, विघ्नहर्ता क्लिनिक येथे डॉ. टोपकर मुलांना वैद्यकीय सेवा मोफत देतात, तसेच जिल्हा रूग्णालय,कोल्हापूर येथे नेले जाते. डॉ. हर्षवर्धन जगताप हे संस्थेला नियमित भेट देतात. प्रथमोपचार पेटी उपलब्ध आहे. ''संजीवनी'' फौउंडेशन यांचे मॉर्फत औषध पुरवठा केला जातो. संजीवन हॉस्पिटल कोल्हापूर यांचे द्धारे वर्षातुन दोन/तीन वेळा लैंगिक शिक्षण या विषयावर व्याख्यान देण्यात येते.

मुलांसाठी फुटबॉल, व्हॉलीबॉल, खोखो, कबड्डी,क्रिकेट,झोपाळा सारखे खेळ घेण्यात येतात. अंतर्गत खेळांसाठी बुध्दीबळ, कॅरम,दोरीच्या उडया,सापशिडी सारखे खेळ आहेत. दररोज सकाळी व्यायाम,सूर्य नमस्कार, योग घेण्यात येतात. सायकल चालविणे,पोहण्याचे शिक्षण मुलांना देण्यात येते. संस्थेचे खेळण्यासाडी लहान मैदान आहे. तसेच करमणुकीसाठी दुरदर्शन संच व आकाशवाणी संच,डी.व्ही.डी.,ग्रंथालय उपलब्ध आहे. विविध वर्तमान पत्रांचे सामुहिक वाचन करण्यात येते. अहवालकाळात मुलांच्या इंग्रजी व गणित या विषयात प्रगती व्हावी या उद्देशाने श्री विवेक कानडे हे मुलांना मोफत शिकवतात. सौ. अनिता कोळी हे मुलांची विषयवार शिकवणी घेतात.

वार्षिक परीक्षेत सर्व मुले उत्तीर्ण झाली. मुले व्यावसायिक प्रशिक्षण घेत आहेत. इ. १० वीच्या परीक्षेत कु. सुशांत पाटील ८५ टक्के, कु. निरज साळोखे ७४ टक्के गुणांनी उत्तीर्ण झाली. ही मुले सध्या डिप्लोमा करत आहेत. कु. भरत तागड याने हॉटेल मॅनेजमेंट करून सध्या सयाजी हॉटेल मध्ये प्रॅक्टिस जॉब करत आहे. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास व परीक्षेत मानसिक संतुलन या विषयावर सौ. गायत्री जोशी आणि श्री दिपक जोशी यांनी मुलांना मार्गदर्शन केले. गणित विषयासाठी सौ. मृदुला रेमण मॅडम येतात. दर रविवारी दोन तासांचे मुलांचे प्रात्यक्षिकासह व्याख्यान आयोजित करण्यात येते. जीवनाशय बाल युवा केंद्र कोल्हापूर मदतीने दर रविवारी व्यक्तिमत्व विकासावर तसेच समुपदेशन, प्रात्यक्षिक याचा मुलांना लाभ होत आहे. श्री शारोन रणजीत जाट यास गणित विषयाच्या एम.टी.एस. परीक्षेत प्रथम क्रमांक मिळाला असुन जिल्हा एम.टी.एस. परीक्षेस निवड झाली. सामुहिक-वैयक्तिक समुपदेशन उपक्रम चालु आहे. श्री योगेश फौउंडेशन कोल्हापूर यांचे मार्फत मेडिटेशन सेशन घेण्यात येते माजी विद्यार्थी गणेश गरड मुलांचे डान्स सेशन घेतो..

तजल्हा महिला बाल विकास कडुन महाराष्ट्र शासन आयोजित जिल्हा बाल मेळाव्यात निबंध स्पर्धेत कु. सारंग पाटील प्रथम आला. कु. सुशांत पाटील चित्रकला स्पर्धेत प्रथम, कु. अक्षय हिंगणे तितिय आला. संस्थेच्या कबड्डी संघास द्धितिय क्रमांक मिळाला. संस्थेतील ०४ विद्यार्थ्यांना शालेय तालुकास्तरिय कबड्डी व खो खो स्पर्धेत भाग घेतला दोन्ही क्रिडा प्रकारात दुसरा क्रमांक आला.

BALGRAM MAHARASHTRA PUNE



बालग्राममध्ये सर्व धार्मिक, राष्ट्रीय सण, विशेष दिन, थोरांच्या जयंत्या साजरे केले जातात. द जंगल बुक हा चित्रपट मुलांना दाखविण्यात आला. बाल कल्याण समिती तर्फे दिवाळी निमित्त मुलांना तीन ड्रेस व फराळ देण्यात आला. रक्षा बंधन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्णुन मा. न्या. पी.बी. रेमणे साहेब पन्हाळा न्यायालय बालग्राम महाराष्ट्र अध्यक्ष श्री रजनीकांत नॅन्सी, श्रीमती शेवंता चव्हाण विश्वस्त, श्री अनंत हावळ, श्री रमेश कवडे, श्री अशोक घाडगे यांच्या उपस्थितीत एक सुंदर कार्यक्रम संपन्न झाला.

श्री एम.बी. माने परिविक्षा अधिकारी, श्री यशवंत गवारी पी.आय. न्यायाधिश जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, कोल्हापूर हॅप्पी माईंड मुंबई, आभास फौंउडेशन श्री अतुल भेंडे सौ. प्रियदर्शनी चोरगे, बाल कल्याण समिती सदस्या, श्री सुरज गुरव, पोलिस उपाधिक्षक श्री धन्यकुमार गोडसे, पोलिस निरिक्षक, कोल्हापूर, पन्हाळा नगराध्यक्षा सौ. रूपाली धडेल, रोटरी क्लब ऑफ हुपरी यांनी तसेच अनेक मान्यवरांनी संस्थेस भेट देवुन कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे अहवालसाली संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. बाबासाहेब जाधव यांची जन्म शताब्दी दिन १७-६-२०१६ उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मा. तहसीलदार, पन्हाळा हे उपस्थित होते. तसेच दिनांक १४-११-२०१६ रोजी श्री धन्यकुमार गोडसे, पोलिस निरीक्षक, पन्हाळा व संस्था संचालक श्री अनंत हवळ यांच्या उपस्थितीत बालदिन कार्यक्रम संपन्न झाला. त्यावेही श्री गोडसे यांनी रूपये २२,५००/- ची १०० पुस्तके संस्थेस भेट दिली.

### ७) डॉ. हरमन मायनर सोशल सेंटर फॉर स्ट्रिट चिल्ड्रेन,पुणेः

पुणे येथे पथवासी मुलांसाठी बालग्राम महाराष्ट्रा तर्फे या सामाजिक केंद्राची स्थापना १४-११-९६ रोजी पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीच्या दिवशी झाली. रस्त्यावर रहाणा-या मुलांना जगवण्याचा नवा मार्ग या केंद्राने दाखविला आहे. मुलांना औपचारिक व अनौपचारिक असे दोन्ही प्रकारचे शिक्षण या केंद्रामार्फत दिले जात होते. मुलांना स्वाभिमानाने जगता यावे असे प्रयत्न केले जातात. शिक्षणा बरोबर मुलांना स्वच्छता, आरोग्य व लेखन इत्यार्दि बाबत शिक्षण दिले जाते. मुलांना जवळच्या शाळेत प्रवेश देउन त्यांचे शिक्षण चालु ठेवण्यात येते. मुलांना खेळाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. मुलांना योग्य व सकस आहार दिला जातो. मुलांचा व्यक्तिमत्व विकास करण्याचा प्रयत्न केला जातो. केंद्रामध्ये असणा-या सर्व मुलांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. मुलांच्या आरोग्य/वैद्यकीय सेवेसाठी डॉ. दळवी हॉस्पिटल आणि ससुन रूग्णालयात उपचार घेण्यात येतात.

संस्थेतील मुलांची वैद्यकीय तपासणी, रक्त तपासणी, दंत चिकित्सा व डोळे तपासणी करण्यात आली. किडलेल्या दाढा काढण्यात आल्या. मर्सिडिस बेंझ स्कुलच्या पी.टी.ए. लोकांनी मदत केली.

BALGRAM MAHARASHTRA PUNE



या केंद्रामध्ये एकुण ५५ मुले आहेत. त्यापैकी ३३ मुले व २२ मुली आहेत. त्यापैकी १८ मुले प्राथमिक, १८ मुले माध्यमिक, १४ मुले उच्च माध्यमिक आणि ०५ मुले महाविद्यालयीन शिक्षण घेतात. इ. १ली ते इ.१०वी पर्यन्तची मुले भारत इंग्लिश स्कुल येथे शिक्षण घेतात. इ. ११वी इ. १२वीच्या विद्यार्थ्यांना MS CIT कोर्स देण्यात आला आहे. सोशल वर्कर मुलांना शिकविण्यामध्ये महत्वाची भुमिका पार पाडतात. मुलांची शैक्षणिक प्रगती उत्तम आहे. महाविद्यालयामध्ये जाणा-या मुलांसाठी बाहेरील शिकवणी वर्ग लावले जातात. मुलांसाठी संगणक प्रशिक्षण दिले जाते.

केंद्रामध्ये मुलांकरीता विविध उपक्रम राबवुन मुलांचे पुनर्वसन केले जाते. मुलांना बचतीचे महत्व पटवुन दिल्यामुळे मुले त्यांचे पैसे बँकेत जमा करतात. मुलांना विविध साहित्य उदा. मेणबत्ती बनविणे,ग्रिटिंग कार्ड इ. वस्तु तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. सेंटरमध्ये संगणक असुन मुलांना प्रशिक्षण दिले जाते. वर्षभरात येणारे सर्व राष्ट्रीय सण,जयंती,पुण्यतिथी साजरे केले जातात. दिवाळीत मुलांना नविन कपडे, फराळाचे देण्यात आले. संस्थेला २१ वर्षे पूर्ण झाल्याने श्रीमती छाया कुलकर्णी यांनी सोलापूरी चादरी वाटल्या. वस्ती पातळीवरील ध्वजा वंदनामध्ये मुले सहभाग घेतात. केंद्रातील सर्व विद्यार्थी शालेय उपक्रमांमध्ये सहभाग घेतात. बालग्राम महाराष्ट्राच्या सचिव श्रीमती रंजनताई पुराणिक, को-ऑर्डिनेटर यांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज चालते. श्री शिरीष खामकर हे सिनियर सोशल वर्कर, सौ. अरूणा मिर्वणकर व श्रीमती नंदा बिबवे (थोरात) हे ज्युनियर सोशल वर्कर व सौ. वंदना जाधव हे लेखापाल म्हणुन काम पहातात. सेंटर मध्ये बैठे खेळ घेतले जातात. त्यामध्ये बुध्दिबळ,कॅरम बोर्ड, लुडो इ. खेळ घेण्यात येतात. करमणुकीसाठी डी.व्ही.डी प्लेयर, टी.व्ही.,इ. साधने आहेत. तसेच केंद्रामध्ये गोष्टीची/सामान्य ज्ञानाची पुस्तके आहेत.

कु. रेणुका कोळी इयत्ता ६वीत सर्व तुमडयांमधुन प्रथम आली. इंग्रजीत सर्वात जास्त गुण मिळाले. कु. अथिती सुर्यवंशी हिला श्लोक पाठांतरकविता व गोष्ट यात प्रथम आली. महेश कोळी चॉपलिन रेस मध्ये तृतिय आला. लोणावळा येथील खेळांच्या स्पधेत मुलांनी बक्षिसे मिळविलीत. सांस्कृतिक कार्यक्रमासाठी नृत्य, पथनाट्य बसविले जातात. मुलांची शैक्षणिक प्रगती उत्तम आहे. यु टयुब वरून चित्रकलेचे नमुने शिकविणे, मेंदी काढण्याचे शिक्षण दिले जाते. मुलांचा शैक्षणिक/मैदानीखेळांच्या उपक्रमात विशेष प्राविण्यासह कामगिरी केली .शैक्षणिक प्रगतीसाठी स्वयंसेवक आणि कर्मचारी वर्ग मुलांच्या अभ्यासासाठी सहकार्य करतात. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी श्री जोशी, श्री लकडावाला व कॉग्निझंटचे वॉलेंटियर्स येताता.

सौ. रेश्मा चोपडा, गोवठकर क्लिनिक, श्रीमती सुजाता पुराणिक, सौ. नंदिनी आपटे आणि श्री संदीप मंत्री पुणे यांनी अहवाल साली केंद्राला भेटी दिल्या. तसेच समाधान व्यक्त केले.

संस्थेची स्वतःची जागा नसल्याने खेळाचे मैदानही नाही. स्वतःची जागा (प्लॉट) घेण्यासाठी श्रीमती रंजनताई पुराणिक (सचिव) श्री अशोक घाडगे (कार्यकारी संचालक)हे देणगी मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणुन कॉग्निझंट कंपनी मधील टॅलेंट प्रोग्रॅम अंतर्गत केंद्रातील सर्व मुलांचा सहभाग. लोणावळा शिबीर २०१६ मध्ये १२ विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळाली. शालेय क्रिडा संमेलनात मुलांना बक्षिसे मिळाली. बेस्ट डिसिप्लिन अॅवॉर्ड देवुन गौरविण्यात आले.

*********

BALGRAM MAHARASHTRA
PUNE



**विश्वस्त/संचालक/वार्षिक सर्वसाधारण मंडळाच्या सभाः**

सन २०१६-१७ साली विश्वस्त मंडळाच्या ०५ ,संचालक मंडळाच्या ०५ तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेची ०१ बैठक घेण्यात आल्या. तसेच सेवा नियमावली समितीची बैठक घेण्यात आली.

| | विश्वस्त | संचालक | वार्षिक सर्वसाधारण सभा |
|---|---|---|---|
| १) | दि. ३०-०३-२०१३ | दि. ३०-०३-२०१६ | दि. ३०-०६-२०१६ |
| २) | दि. ३०-०६-२०१६ | दि. ३०-०६-२०१६ | |
| ३) | दि. १४-१०-२०१६ | दि. १४-१०-२०१६ | |
| ४) | सेवा नियमावली समिती बैठक | दि. १३-१२-२०१६ | |
| ५) | दि. ३०-१२-२०१६ | दि. ३०-१२-२०१६ | |
| ६) | दि. ३०-०३-२०१७ | दि. ३०-०३-२०१७ | |

**निधी संकलनः**

श्री विनायक पाटील यांची प्रकल्प संचालक/निधी संकलक म्हणुन नियुक्ति केली होती. त्यांनी केवळ एक महिना काम पाहिले व त्यांना पंचदीप संकुल नविन पनवेल येथे अधिक्षक म्हणुन माहे फेब्रुवारी २०१६ पासुन देण्यात आली. श्री वैभव खेंगरे निधी संकलक म्हणुन नियुक्ति केली होती. त्यांनी दिनांक १६-५-२०१६ ते दिनांक ३०-४-२०१७ अखेर त्यांनी काम पाहिले. काम असमाधानकारक.

**उन्हाळी शिबीर २०१५-१६**

प्रत्येक संस्थेने स्वतंत्रपणे उन्हाळी शिबीराचे आयोजन केले होते. ते अहवाल नमुद केलेले आहेत.

वार्षिक सर्व साधारण मंडळाची बैठक जुन २०१६ च्या बैठकीतील निर्णयानुसार खालील संस्था व संचालक मंडळाचे सदस्य यांचे सभासदत्व रद्द करण्यात आले. बालग्राम महाराष्ट्राचे संलग्न संस्थांचे सभासद सतत गैरहजर असल्याने सभासदत्व व संलग्नता रद्द करण्यात आले.

१) गुरूकुंज आश्रम,अमरावती
२) बाल मंदिर संस्था, नागपुर
३) आंतर भारती बालग्राम,लोणावळा
४) 'संपर्क' बालग्राम, भाजे,जिल्हा पुणे

खालील संचालक मंडळा वरील सभासद बैठकीस सतत गैर हजर असल्याने त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात आले

१) श्री अमितकुमार बॅनर्जी,भाजे
२) सौ. सुप्रिया शिर्के, पुणे
३) श्री असिम सरोदे, पुणे
४) श्री अरूण खोरे, पुणे
५) सौ. प्रभा ब्रुसनर, पुणे.

**********************

BALGRAM MAHARASHTRA PUNE



बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र,पुणे ४११००१

## मुलांचे शालेय वर्गीकरण: २०१६-२०१७

| अ.क्र | शालेय वर्गीकरण | मुले | मुली |
|---|---|---|---|
| १ | पुर्व प्राथमिक | ०१ | -- |
| २ | १ ली ते ४ थी | २१ | २७ |
| ३ | ५ वी ते ७ वी | ३९ | ४४ |
| ४ | ८ वी ते १० वी | १८ | ३१ |
| ५ | कॉलेज | ०६ | १० |
| ६ | व्यवसायिक शिक्षण | ०३ | ०५ |
| ७ | इतर | -- | -- |
| | एकुण: | ८८ | ११७ |
| | मुले + मुली | २०५ | |

## मुलांचे वयोगटानुसार वर्गीकरण

| अ.क्र | वयोगट | मुले | मुली |
|---|---|---|---|
| १ | ०० ते ०४ | -- | -- |
| २ | ०४ ते ०९ | १७ | २६ |
| ३ | ०९ ते १४ | २६ | ५७ |
| ४ | १४ ते १८ | ३१ | ३५ |
| ५ | १८ वर्षा पुढील | ०८ | ०५ |
| | एकुण: | ८२ | १२३ |
| | मुले + मुली | २०५ | |

**********

BALGRAM MAHARASHTRA PUNE



बालग्राम एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेजेस महाराष्ट्र,पुणे ४११००१
संलग्न स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या बालसदनांची यादी
✲ सन २०१६ – २०१७ ✲

| अ. क्र. | संस्थेचे नांव | बालसदनांची संख्या | मंजुर संख्या | पटावरील मुले | पटावरील मुली | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री दिलिपसिंह राजे घाटगे बालग्राम, पन्हाळा, कोल्हापूर | ०३ | ०३० | २० | -- | २० |
| २ | डॉ. ह.मा. सोशल सेंटर, पुणे | -- | ०५० | ३३ | २२ | ५५ |
| ३ | सुनित विकास केंद्र अंबरनाथ | ०१ | ०१० | ०० | ०८ | ०८ |
| ४ | पंचदीप संकुल, न. पनवेल | ०२ | ०२० | ०७ | १४ | २१ |
| ५ | इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्र.,पुणे | ०४ | ०३० | | २७ | २७ |
| ६ | आनंद बालग्राम,सगरोळी, | १२ | १०८ | ०० | २४ | २४ |
| ७ | चंद्रभान आठरे पाटील बालगृह, अहमदनगर | ०८ | १०० | २८ | २२ | ५० |
| | **एकुणः** | **३०** | **३४८** | **८८** | **११७** | **२०५** |

खालील संस्थांचे वार्षिक अहवाल अप्राप्त असल्यामुळे त्यांचा समावेश करता आला नाही

१] बालग्राम येरवडा, पुणे
२] आश्रय' संस्कार,मालेगांव
३] कस्तुरबा बालसदन, सासवड
४] कस्तुरबा बालसदन,धारणी

ASHOK GHADGE J 4/1 2017.
**Executive Director**
**Balgram SOS Children's Villages**
Maharashtra - Pune

**********************